Government Of Maharashtra
Commissioner
Medical Education, Research &
AYUSH,
Mumbai

सत्यमेव जयते

Anil Bhandari, I.A.S
Commissioner

Email: commissioner-dmer@mah.gov.in

D.O 111 / 2026

दिनांक : 08.01.2026

विषय: - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्याबाबत

संदर्भ: - 1. शासन अधिसूचना क्रमांक RNI No.MAHBIL/२००९/३७८३१, दिनांक १६.०९.२०२५

2. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-०९२५/प्र.क्र.३२५/प्रशास-२ दिनांक ३०.०९.२०२५ व दिनांक ०४.११.२०२५.

उपरोक्त विषयी शासनाने दिनांक १६.०९.२०२५ अन्वये निर्गमित केलेल्या अधिसुचनेत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३(१) चा वापर करुन परिशिष्ट १ मध्ये पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुधारीत केल्या आहेत. सदर परिशिष्टाप्रमाणे वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांतर्गत पात्र व्यक्तींना वय प्रमाणपत्र, वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र आणि आजारी रजेसाठी वैद्यकीय प्रामाणपत्र या लोकसेवा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. सदर सेवा हया ऑनलाईन पध्दतीने dmer.mahait.org अंतर्गत आपले सरकार पोर्टल द्वारे उपलब्ध करण्यात येणार आहेत. सदर सेवांकरीताची कार्यप्रणाली शासन निर्णय दिनांक ०४.११.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आली असून उक्त सेवांकरीता आकारण्यात येणारे ऑनलाईन शुल्काबाबतचा शासन आदेश दिनांक ३०.०९.२०२५ अन्वये निर्गमित केला आहे.

तथापि, शासनाने अधिसूचित केलेल्या सेवा पात्र व्यक्तींना ऑनलाईन पध्दतीने देण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्याच्या सुचना या पत्रान्वये देण्यात येत आहे. संस्थेने यापुढे ऑनलाईन पध्दतीने पात्र झालेल्या व्यक्तीने सादर केलेल्या विनंतीनुसार अनुज्ञेय प्रमाणपत्र दिनांक ०४.११.२०२५ अन्वये दिलेल्या कार्यप्रणालीचा वापर करुन विहित मुदतीत उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

08.01.26

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई

प्रति,
सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अधिष्ठाता,वैद्यकीय अधिक्षक आणि प्रभारी सहयोगी प्राध्यापक, आरोग्य पथके.

Address: 4th Floor, Govt. Dental College & Hospital Building, St. George's Hospital Compound, Mumbai-400 001.
Tel – 022 2262 0363 Ext.321. / Email.: pa.commissionermededu@gmail.com

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १३१] मंगळवार, सप्टेंबर १६, २०२५/भाद्रपद २५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३२६

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ९ वा मजला, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक १६ सप्टेंबर, २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक संकीर्ण-०६१५/प्र.क्र.५९/अधिनियम.– ज्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. ३१) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक संकीर्ण-०६१५/प्र.क्र.५९/अधिनियम, दिनांक २७ जुलै, २०१५ आणि अधिसूचना क्रमांक संकीर्ण-०६१५/प्र. क्र. ५९/अधिनियम, दिनांक १७ जून, २०१७ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्तालयासह त्याच्या अधीनस्थ कार्यालये आणि प्राधिकरणांद्वारे त्या विभागाकडून पात्र व्यक्तींना देण्यात येणाऱ्या लोकसेवा नियत कालमर्यादेमध्ये पुरविण्याबाबत पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी याबाबी उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अधिसूचित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्तालयामार्फत नियत कालमर्यादेमध्ये पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी याबाबींसोबत पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा अधिसूचित करणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास हितावह वाटते.

त्याअर्थी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन उक्त अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार उक्त अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करत आहे :–

उक्त अधिसूचनेतील परिशिष्ट-१ मध्ये खालील बाबी समाविष्ट केल्या जाईल;

## परिशिष्ट–१

(वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय व त्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्यामार्फत पात्र व्यक्तींना पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा)

| अ. क्र. (१) | लोकसेवा (२) | नियत कालमर्यादा (३) | पदनिर्देशित अधिकारी (४) | प्रथम अपील प्राधिकारी (५) | द्वितीय अपील प्राधिकारी (६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | वय प्रमाणपत्र | ५ दिवस | वैद्यकीय मंडळ | वैद्यकीय अधीक्षक | अधिष्ठाता |
| २. | वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र | ५ दिवस | वैद्यकीय मंडळ | वैद्यकीय अधीक्षक | अधिष्ठाता |
| ३. | आजारी रजेसाठी वैद्यकीय प्रमाणपत्र | ३ दिवस | निवासी वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय अधीक्षक | अधिष्ठाता |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदिप ढाकणे,**
शासनाचे उपसचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

G. T. Hospital Complex, 9th floor, New Ministry, Lokmanya Tilak Road,
Mumbai 400 001, Dated 16th September, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ACT, 2015.

No. MIS-0615/C.R.59/Acts.—Whereas in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 3 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015) (hereinafter referred to as "the said Act"), the Medical Education and Drugs Department by the Government and by Notification, **No. MIS-0615/C.R.59/Acts, dated 27th July 2015 Notification, No. MIS-0615/C.R.59/Acts, dated 17th June, 2017** (hereinafter referred to as "the said Notification") notified the public services rendered by that department to eligible persons through its subordinate offices and authorities including the Commissionerate of Food and Drugs Administration, Mumbai, alongwith the Stipulated Time Limits for providing such public services, the Designated Officers and First and Second Appellate Authorities, as specified in the *Schedule-I* appended to the said Notification for the purposes of the said Act;

And whereas the Government of Maharashtra in Medical Education and Drugs Department, considers it expedient to notify under sub-section (*1*) of Section 3 of the said Act public services for Drug Selling License Holders and for Drug Manufacturing License Holders under the Drugs and Cosmetics Act, 1940 and the Rules thereunder by the Commissionerate of Food and Drugs Administration alongwith the Stipulated Time Limit for providing the said public services, Designated Officer and First and Second Appellate Authorities;

Now, therefore, the Government of Maharashtra in Medical Education and Drugs Department, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 3 of the said Act, hereby amends the said Notification on full in the said Notification, in *Schedule- I* the following entry shall be added, namely :—

*Schedule- I*

(Public services provided to eligible persons through the Directorate of Medical Education and Research and the government medical colleges and hospitals under it)

| Sr. No. (1) | public service (2) | Stipulated time limit (3) | designated officer (4) | first appellate authority (5) | Second Appellate Authority (6) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Age certificate (Non-MLC/Civil case) | 5 days | Medical Board | Medical Superintendent | Dean |
| 2. | Medical Fitness Certificate | 5 days | Medical Board | Medical Superintendent | Dean |
| 3. | Medical Certificate for Sick Leave | 3 days | Resident Medical Officer | Medical Superintendent | Dean |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANDEEP DHAKANE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत आपले सरकार पोर्टलवर वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांसाठी शुल्क निश्चितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०९२५/प्र.क्र.३२५/प्रशा-२**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
गो. ते. संकुल इमारत, ९ वा मजला, मंत्रालय, मुंबई.
तारीख: ३० सप्टेंबर, २०२५

**वाचा :-**

१. दिनांक २८.०४.२०१५ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेला "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५".
२. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक - संकीर्ण - २०१६/प्र.क्र.३८८/प्रशा-१, दिनांक ०४.०७.२०१७
३. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक - वैशिवि-२०१७/प्र.क्र.१९१/प्रशा-२, दिनांक २०.११.२०१७
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक - आसके-१७२५/प्र.क्र. ८६/मात (३९), दिनांक २७.०३.२०२५
५. वैद्यकीय शिक्षण विभाग, अधिसूचना क्र. संकीर्ण-०६१५/प्र.क्र.५९/अधिनियम, दिनांक १६.०९.२०२५
६. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. क्र.संवैशिवसं/म.लो.हक्क आयोग/समन्वय/५८९५/२०२५ , दिनांक २४.०९.२०२५

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३(१) नुसार, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी, आपल्या अधिनस्त संस्थांतर्फे पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा, त्या सेवेसाठी निश्चित कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी यांची अधिसूचना करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने, शासनाने दिनांक १६.०९.२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्फे दिल्या जाणाऱ्या आजाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र, वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र व वय प्रमाणपत्र या ३ सेवांचा लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मध्ये समावेश करण्यात आलेला आहे. सदर सेवांसाठी ऑफलाईन अर्जावर शासन निर्णय दि. २०.११.२०१७ मधील तरतुदीनुसार शुल्क आकारले जाते. सदर सेवा ऑनलाईन पध्दतीने आपले सरकार पोर्टल वर उपलब्ध करून देण्यासाठी शुल्कामध्ये सेवा शुल्क अंतर्भूत सुधारीत शुल्क निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत आपले सरकार पोर्टल वर वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्फे पात्र व्यक्तींना पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठी खाली नमूद शुल्क आकारण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | सेवा / प्रमाणपत्राचा तपशील | ऑनलाईन सेवेसाठी शुल्क |
|---|---|---|
| १. | आजारी रजेसाठी वैद्यकीय प्रमाणपत्र | १०० + ५० (सेवाशुल्क) |
| २. | वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र | २०० + ५० (सेवाशुल्क) |
| ३. | वय प्रमाणपत्र | २०० + ५० (सेवाशुल्क) |

२. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्फे दिल्या जाणाऱ्या सेवांची कालमर्यादा व अपील प्राधिकाऱ्यांचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत -

| अ.क्र. | लोकसेवा | कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | आजारी रजेसाठी वैद्यकीय प्रमाणपत्र | ३ दिवस | निवासी वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय अधीक्षक | अधिष्ठाता |
| २ | वय प्रमाणपत्र | ५ दिवस | वैद्यकीय मंडळ | वैद्यकीय अधीक्षक | अधिष्ठाता |
| ३ | वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र | ५ दिवस | वैद्यकीय मंडळ | वैद्यकीय अधीक्षक | अधिष्ठाता |

३. शासन निर्णय दि. ०४.०७.२०१७ मधील तरतुदीनुसार पात्र लाभार्थ्यांना या सेवा विनाशुल्क / मोफत केवळ ऑफलाईन पद्धतीने केलेल्या अर्जांसाठी उपलब्ध राहतील. आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन सेवेसाठी वरील सुधारीत शुल्क आकारले जाईल.

४. संबंधित अधिष्ठाता / वैद्यकीय अधीक्षक यांनी सेवांचे योग्यवेळी वितरण सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९३०१८१०१९२११३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO
GIRDHARI
JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=0477d837dc0b00fc2dbd45d17d07c625c3417378f97d493aea277fa29f65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE9623688A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2025.09.30 19:59:15 +05'30'

**(म. गि. जोगदंड)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, नागपूर/मुंबई.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४. संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई.
५. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
८. सर्व अधिष्ठाता/अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये.
९. कक्ष अधिकारी (समन्वय), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (प्रशा-२)

**लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत आपले सरकार पोर्टलवर वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या ऑनलाईन अंमलबजावणीसाठी मानक कार्यप्रणाली (SOP) चा वापर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०९२५/प्र.क्र.३२५/प्रशा-२**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार

गो. ते. संकुल इमारत, ९ वा मजला, मंत्रालय, मुंबई.

तारीख: ०४ नोव्हेंबर, २०२५

<u>वाचा :-</u>

१. दिनांक २८.०४.२०१५ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेला "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५".
२. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक - संकीर्ण - २०१६/प्र.क्र.३८८/प्रशा-१, दिनांक ०४.०७.२०१७
३. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक - वैशिवि-२०१७/प्र.क्र.१९१/प्रशा-२, दिनांक २०.११.२०१७
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक - आसके-१७२५/प्र.क्र. ८६/मात (३९), दिनांक २७.०३.२०२५
५. वैद्यकीय शिक्षण विभाग, अधिसूचना क्र. संकीर्ण-०६१५/प्र.क्र.५९/अधिनियम, दिनांक १६.०९.२०२५
६. वैद्यकीय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२५/प्र.क्र.३२५/प्रशा-२, दिनांक ३०.०९.२०२५
७. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. क्र.संवैशिवसं/म.लो.हक्क आयोग/समन्वय/३७२४/२०२५ , दिनांक २५.०९.२०२५

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३(१) नुसार, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी, आपल्या अधिनस्त संस्थांतर्फे पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा, त्या सेवेसाठी निश्चित कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी यांची अधिसूचना करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने, शासनाने दिनांक १६.०९.२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्फे दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय रजेसाठी प्रमाणपत्र, वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र व वय प्रमाणपत्र या ३ सेवांचा लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मध्ये समावेश करण्यात आलेला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सदर सेवांच्या ऑनलाईन अंमलबजावणीसाठी संचालनालयाने तयार केलेल्या मानक कार्यप्रणाली (SOP) निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्फे पात्र व्यक्तींना उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र, वैद्यकीय रजेसाठी प्रमाणपत्र व वय प्रमाणपत्र या ३ सेवांचा अंमलबजावणी संदर्भात मानक कार्यप्रणालीस (SOP) सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर सेवांसाठी आकारण्यात येणारे शुल्क शासन निर्णयाच्या वाचा क्रमांक ६ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ३०.०९.२०२५ च्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आले असून, त्यामध्ये आवश्यकतेनुसार शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या कोणत्याही दुरुस्ती, सुधारणा किंवा शुल्कवाढीचे आदेश लागू राहतील.

३. संबंधित संस्थेतील अधिष्ठाता / वैद्यकीय अधीक्षक यांनी या सेवांचे वितरण निर्धारित कालमर्यादेत आणि SOP मध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेप्रमाणे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५११०४१११५०५२३१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUDHIR
JAYA
SHETTY

Digitally signed by SUDHIR JAYA SHETTY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E9D37D499A521B728AEB3DC8EC38B759420308B9FD7816002B4AF0FFBF1111D7, cn=SUDHIR JAYA SHETTY
Date: 2025.11.04 13:18:01 +05'30'

**(सुधीर शेट्टी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सोबत - परिशिष्ट अ

प्रत,


१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, नागपूर/मुंबई.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४. संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई.
५. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
८. सर्व अधिष्ठाता/अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये.
९. कक्ष अधिकारी (समन्वय), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (प्रशा-२)

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०९२५/प्र.क्र.३२५ /प्रशा-२, दिनांक ऑक्टोबर, २०२५
सोबतचे परिशिष्ट अ

## STANDARD OPERATING PROCEDURE (SOP) FOR ISSUING THE CERTIFICATES TO BE NOTIFIED UNDER RIGHT TO SERVICES ACT, 2015

The Directorate of Medical Education & Research (DMER) intends to notify patient services viz., Age Certificate (Non-MLC / Civil Cases), Medical Fitness Certificate and Medical Certificate for sick leave under Right to Services (RTS) Act, 2015. These services are being provided by Government Medical College & Hospitals (GMCHs) across the state. However, the processes and the certificates issued for the abovementioned services are not uniform. Therefore, this document delineates the Standard Operating Procedure (SOP) for issuing,

1. **Age Certificate (Non-MLC / Civil Cases)**
   Age certificate for civil cases shall be provided for education, employment, marriage, sports, adoption, pension disputes, registration for government schemes and civil court cases — basically wherever age has a legal or administrative consequence, but documentary proof is missing or challenged. The steps mentioned below will provide a standardized, transparent, and legally valid process for age estimation in non-medico-legal (civil) cases issued by Government Medical College & Hospitals in Maharashtra. The process flow for age certificate application is as under:



The details of the process for application of age certificate is elucidated below:

a. **Application & Registration:** The applicant is expected to register on the Aaple Sarkar Portal. Upon registration the applicant can apply for age certificate under Medical Education & Drugs Department → Directorate of Medical Education & Research → Application of Age Certificate (Non-MLC / Civil Cases) → Patient Consent → Appointment at the designated GMCH.

b. **Patient Registration & Bill Payment:** The applicant shall visit the designated hospital on the appointment and register with the hospital. Upon registration, the applicant shall make payment for Age Certificate. He / she shall furnish the age certificate appointment receipt while making the payment. **The age certificate fee is Rs. 200+MahaIT charges excluding GST.**

c. **Medical Examination Board:** Directorate of Medical Education & Research (DMER) is constituting a Medical Board with the mandate to examine and issue age certificate for Non- MLC / Civil Cases. The MB shall comprise of following members:

| Consultant | Responsibility |
|---|---|
| Professor or Associate Professor from General Medicine Department | Chairperson |
| Radiologist | Member |
| Dentist | Member |
| Pediatrician / Pedodontist (in case the applicant is minor) | Invitee |
| Orthopaedician (in case of additional bone assessment requirement) | Invitee |
| Resident Medical Officer | Member Secretary |

d. **Medical Examination Protocol:**
   - **Step 1:** General Physical Examination
   - **Step 2:** Secondary Sexual Character Assessment
   - **Step 3:** Dental Examination
   - **Step 4:** Radiological Examination

e. **Opinion Formation:** Medical Board shall correlate findings from clinical, dental, and radiological sources and conclude the approximate age of the applicant. The findings shall be entered into the portal by RMO and shall be approved by the any 3 of the 4 member Medical Board.

f. **Certification:** Age Certificate generated with QR code & digital signature.

g. **Record Keeping:** Reports archived for minimum 3 years in digital records.

h. **Escalation:** In case the applicant is not satisfied with the response, the applicant can escalate the request for re-scrutiny to Appellate Authority.


2. **Medical Fitness Certificate**

The Directorate of Medical Education & Research vide GR dated 8th May 1990, has mandated issuing Medical Fitness Certificate for following cases:

- Central Government / State Government / ULBs / PSUs
- Private Services

- Student admission
- Application for driving license
- Application for arms license
- Participation in Sports Events / NCC / Army / Police Training
- Participation in pilgrimage (Amarnath yatra, Hajj, Mansarovar yatra, etc.)
- Execution of will
- In case of requirement by any Government Department

Therefore, this document intends to establish a standardized process for issuing **Medical Fitness Certificate** across all Government Medical College & Hospitals in Maharashtra. The certificate shall be issued by the Medical Board as mentioned in the said GR. The steps mentioned below will provide a standardized, transparent, and legally valid process for medical fitness certificate issued by Government Medical College & Hospitals in Maharashtra. The process flow for age certificate application is as under:




The details of the process for application of medical fitness certificate is elucidated below:

a. **Application & Registration:** The applicant is expected to register on the Aaple Sarkar Portal. Upon registration the applicant can apply for medical fitness certificate under Medical Education & Drugs Department → Directorate of Medical Education

& Research → Application of Medical Fitness Certificate → Appointment at the designated GMCH.

b. **Patient Registration & Bill Payment:** The applicant shall visit the designated hospital on the appointment and register with the hospital. Upon registration, the applicant shall make payment for Medical Fitness Certificate. He / she shall furnish the Medical Fitness Certificate appointment receipt while making the payment. **The medical fitness certificate fee is Rs. 200+MahaIT charges excluding GST**. This will exclude the investigations prescribed in the course of the examination by the medical board.

c. **Medical Examination Board:** The Directorate of Medical Education & Research vide GR dated 8th May 1990 has constituted a Medical Board with the mandate to examine and issue medical fitness certificate. The MB shall comprise of following members:

| Consultant | Responsibility |
|---|---|
| Professor or Associate Professor from General Medicine Department | Chairperson |
| Surgeon | Member |
| Ophthalmologist | Member |
| Obstetrist & Gynecologist | Invitee |
| Orthopaedician | Invitee |
| Otorhinolaryngologist | Invitee |
| Psychiatrist | Invitee |
| Any other specialist (as per requirement) | Invitee |
| Resident Medical Officer | Member Secretary |

d. **Medical Examination Protocol:**
- **Step 1:** General Physical Examination
- **Step 2:** Systemic Examination
- **Step 3:** Examination for Past Surgeries
- **Step 4:** Ophthalmic Examination
- **Step 5:** Any specific Examination as per requirement
- **Step 6:** Investigations (Pathology & Chest Radiograph)

e. **Opinion Formation:** Medical Board shall correlate findings from clinical, and pathological sources and conclude fitness of the applicant. The findings shall be entered into the portal by Resident Medical Officer and shall be approved by the any 3 of the 4 member Medical Board.


f. **Certification:** Medical Fitness Certificate generated with QR code & digital signature.

g. **Record Keeping:** Reports archived for minimum 3 years in digital records.

h. **Escalation:** In case the applicant is not satisfied with the response, the applicant can escalate the request for re-scrutiny to Appellate Authority.

3. **Medical Certificate for sick leave:**

The Directorate of Medical Education and Research is delineating the guidelines for standardizing the process of issuing medical certificate for sick leave across all Government Medical College & Hospitals. The standards defined herewith provide a uniform and accountable process for issuing Medical Certificates for Sick Leave, ensuring fair and timely documentation of illness or injury for civil/administrative purposes under RTS Act. The process flow for medical certificate for sick leave application is as under:




The details of the process for application of medical certificate for sick leave is elucidated below:

a. **Application & Registration:** The applicant is expected to register on the Aaple Sarkar Portal. Upon registration the applicant can apply for medical certificate for sick leave under Medical Education & Drugs Department → Directorate of Medical Education & Research → Application of Medical Certificate for sick leave → **The fee for medical certificate for sick leave is Rs. 100+MahaIT charges excluding GST.**

b. **Scrutiny of the application:** The Resident Medical Officer shall scrutinize the uploaded documents particularly OPD / IPD case papers. Upon scrutiny RMO shall approve or reject or ask for additional documents.

c. **Awarding of the medical certificate:** The certificate issued will be for applying for sick leave for educational and professional purposes. The certificate generated shall be with QR code & digital signature.

d. **Record Keeping:** Reports archived for minimum 3 year in digital records.

e. **Escalation:** In case the applicant is not satisfied with the response, the applicant can escalate the request for re-scrutiny to Appellate Authority.

*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*